## परिशिष्ट

## परिशिष्ट क्र. १

## भाई माधवराव बागल कार्याचा सारांश

- जन्म २८ मे १८९६ कोल्हापूर

<u>कला</u>

| | | |
|---|---|---|
| - | सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई | १९१४ |
| - | पेंटिंग चार वर्षो सतत पहिली स्कॉलरशिप | |
| - | शिल्प चार वर्षाचा कोर्स दोन वर्षात | |
| - | म्युरल डेकोरेशन १ वर्ष, गव्हर्मेंट स्कॉलर | |
| - | मुंबई गव्हर्नर बंगल्यावर ३ मोठी पॅनेल्स | |
| - | गोल्ड मेडल वॉटर कलर लॅन्डस्केपला | १९३५ |
| - | लेडी आयर्विनला वॉटर कलर अलबम भेट | १९३५ |
| - | राजाराम आर्ट सोसायटी व्हा. प्रेसिडेंट | १९३५ |
| - | महाराष्ट्र चित्रकार संमेलन अध्यक्ष | १९३६ |
| - | स्वागताध्यक्ष, महाराष्ट्र चित्रकार संमेलन कोल्हापूर | |
| - | महाराष्ट्र सरकारच्या आर्ट एज्युकेशनच्या सल्लागार समितीवर व स्ट्रेल स्टेट कमिटी स्टेट आर्ट कमिटीवर | ६-१०-६१ |
| - | महाराष्ट्र सरकार चित्रकला प्रदर्शन | १२-३-१९६६ |
| - | उद्घाटक, शालिनी पॅलेस, कोल्हापूर | |

<u>देणग्या</u>

- शाहु छत्रपती बस्ट ( नगर पालिकेत )
- ब्रॉन्झ प्र गंगावेश उद्यानात

.....

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

- ताराराणी विद्यापीठास २०० वॉटर कलर उद्घाटन जनरल करिअप्पा यांच्या हस्ते.
- शिवाजी विद्यापीठात बागल वॉटर कलर पेंटिंग्जची खास वॉल
- टाऊन हॉल मुझियम ३०/४० वॉटर कलर्स
- शिवाजी विद्यापीठास ग्रंथाची देणगी

पुरस्काराने स्मारके

१. म. गांधी ब्रॉन्झ पुतळा वरूणतीर्थ कोल्हापूर
२. महात्मा फुले व आंबेडकर पुतळे बिंदु चौक कोल्हापूर
३. हुतात्मा स्मारक स्तंभ उद्घाटक यशवंतराव चव्हाण

सामाजिक व धार्मिक

- हरिजनासमवेत करवीर जगदंबा मंदिर प्रवेश २५-९-३२
- नृसिंहवाडी दत्त पादुका स्पर्श व पारावर सहभोजन २-१०-३२
- दुतोंडी मारुती देवालय अस्पृश्यास खुले १-१०-३२
- मिश्र विवाह व सहभोजने अध्यक्षतेखाली

१. डिग्रजकर मराठा इनामदार व वन्य जातीतील वधू
२. आमदार आत्माराम पाटील मराठे व वधू ब्राह्मण
३. हवीरे लिंगायत व वधू महार
४. भोजने , चांभारवाडयात, महार व मांग वस्तीत दौऱ्यात
५. महार मुलाला घरी ठेवून शिकवला १९२५

.....

६. अध्यक्ष मुंबई इलाखा हरिजन परिषद १६.१२.१९३५

७. हरिजन नगराध्यक्ष स्विव्हिक बोर्डाचे अध्यक्ष
या नात्याने सोनवणे या ढोर समाजातील
व्यक्तीची निवड

८. अध्यक्ष, अखिल भारतीय सत्यशोधक
परिषद सातारा रोड

९. मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नासाठी १९८३
उपोषण करण्याची घोषणा

१०. मंडल आयोग अंमलबजावणीसाठी सत्याग्रह १९८५

११. अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन
अहमदनगर अध्यक्ष

<u>मजूर चळवळ १९४१ ते १९४७</u>

- शाहू मिल मजूर संघ स्थापना व अध्यक्ष १९४१
- वेतनवाढ, महागाई भत्ता, कामाची वेळ,
फॅक्टरी ॲक्ट आदी मागण्या मान्य करुन
घेतल्या.
- हद्दपारी रेवदंडा अलिबाग नऊ महिने
- सिने थिअटर कामगार संघ स्थापना व अध्यक्ष
पगारवाढीची मागणी मान्य करुन घेतली.
- शुगर मिल कामगार संघाच्या आंदोलनात
सहभाग
- शिंपी कामगार संघ स्थापना व अध्यक्ष
- वेतनवाढ तडजोडीने करुन घेतली.

.....

- कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार संघ
  शहरातील व संस्थानातील मजूर संस्थाचे
  वरील नांवाखाली एकीकरण. यात शाहू
  मिल, शुगर मिल, सिने कामगार, मेकॅनिक्स,
  शिंपी, औषधी नोकर, प्रेस कामगार, गुमास्ता
  नोकर, व्यापारी नोकर संघ, हमाल संघ
  शाहुपूरी, राष्ट्रीय विडी कामगार संघ यांचा
  समावेश करुन परस्परांना मदत करण्याचे धोरण.
- संस्थाना बाहेर
  उगार शुगर मिल कामगार संघ, मिरज विडी
  कामगार संघ, माधवनगर गिरणी मजूर संघ व
  निपाणी विडी कामगार संघ.
- अध्यक्ष दक्षिणी संस्थान कामगार संघ — २२.२.४७
- कोल्हापूर संस्थान सरकारी नोकरांच्या पगार
  वाढीसाठी ९ दिवस उपोषण.
- शिवाजी विद्यापीठ व कर्मचा-यांच्या प्रकरणात
  लवाद म्हणून नियुक्ती.

<u>राजकीय चळवळ</u>

- संपादक " हंटर " साप्ताहिक — १९२५ ते ३०
  लोंडा निवडणूकीत चालना व नेतृत्व
  भाषण, लेखन, संघटना स्वातंत्र्य व जबाबदार
  राज्य पध्दतीची मागणी.
  वेठबिगार, रेसीस, पार्क, दारुबंदी हे प्रश्न
  हाती घेतले.

.....

| | | |
|---|---|---|
| - | ५ हजार रुपयाची जामिनकी व अटी लादून " हंटर " पत्र बंद पडले. "आघाडी", "धडाडी" वृत्तपत्राची सुरुवात सरकारच्या बंदीमुळे बंद पडले. | |
| - | कोल्हापूर कॉंग्रेस कमिटीची स्थापना | १९३१ |
| - | भाषण स्वातंत्र्याचा अर्ज | १९३२ |
| - | जबाबदार शासन पध्दतीची मागणी | १९३७ |
| - | राजद्रोहाची नोटीस | १८.८.३८ |
| - | शेतक-यांचा मोर्चा सभाबंदी भंग, लगेच अटक | |
| - | मुक्तता व मुलभूत हक्कास मान्यता | २६.१.३९ |
| - | ऐतिहासिक विजयी दौरा संस्थानभर व प्रजा परिषदेचा प्रचार | २५.१.३९ |
| - | कोल्हापूर संस्थान प्रजा परिषदेची स्थापना कार्याध्यक्ष व लगेच अटक जयसिंगपूर राजद्रोहाचा खटला दाखल. | ६.२.३९ |
| - | दोन वर्षांची सक्तमजूरी व दंड | |
| - | राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर ताराराणीने सुटका केली. | १८.१२.४० |
| - | अध्यक्ष विठ्ठल बोर्ड, प्रजा परिषद | |
| - | नगर पालिकेवर प्रथम तिरंगी झेंडा लावला | २.१०.४५ |
| - | बागवे मंत्रीमंडळावेळी अटक व सुटका | |
| - | मुख्यमंत्री पदावर प्रजा परिषदेतर्फे निवड व तात्काळ सत्ता न घेताच पद सोडले. | नोव्हें.१९४७ |
| - | प्रशासक नजाप्याच्या काळात स्थानबध्द | |

.....

- धान्य भाव विरोधी चळवळीत शिक्षा
- आझाद हिंद फौज रिलिफ कमेटी, कोल्हापूर अध्यक्ष — १९४६
- उद्घाटक कोल्हापूर संस्थान क्लार्कस् अँन्ड लोअर ग्रेड, गव्हर्मेंट सर्व्हन्टस् युनियन परिषद अध्यक्ष. — १९४६

## इतर संस्थानी चळवळी

| | |
|---|---|
| भोर संस्थान प्रजा परिषद अध्यक्ष | १९४१ |
| मिरज संस्थान प्रजा परिषद अध्यक्ष | १९४२ |
| सांगली संस्थान प्रजा परिषद अध्यक्ष | १९४४ |
| सांगली असेंब्ली बोर्डाचे अध्यक्ष या नात्याने मंत्रीमंडळाची निवड | १९४० |
| सावंतवाडी संस्थान प्रजा परिषद अध्यक्ष | १९४५ |
| जत संस्थान परिषद अध्यक्ष | १९४६ |
| अक्कलकोट अध्यक्ष अधिवेशन पहिले | १९४६ |
| कुरुंदवाड स. प्र. परिषद बुबनाळ उद्घाटक | १०.५.४६ |
| अध्यक्ष दक्षिणी संस्थान, महाराष्ट्र व कर्नाटक विभाग | ८.१०.४६ |

## शेतकरी परिषदा

| | |
|---|---|
| वाळवे जिल्हा सातारा अध्यक्ष | १९४१ |
| इंदोली तालुका कराड अध्यक्ष | १९४२ |
| कासेगांव ता. वाळवा अध्यक्ष | |
| धामणगांव जिल्हा सोलापूर अध्यक्ष | |
| जावळी महाबळेश्वर अध्यक्ष | |
| कोचरे जिल्हा रत्नागिरी अध्यक्ष | ७.१.४६ |

.....

| | |
|---|---|
| शिरोडा जिल्हा रत्नागिरी अध्यक्ष | ८.१.४६ |
| लोणी जिल्हा पुणे अध्यक्ष | १८.२.४६ |
| दापोली जिल्हा पुणे " | ३.३.४६ |
| मणेराजुरी - इचलकरंजी जहागिर | ३०.६.४६ |
| वाल्वे ता. पुरंदर | ३०.५.४६ |
| धामोड, राधानगरी कोल्हापूर | १.६.४६ |

इतर परिषदा

| | | |
|---|---|---|
| - | वाळवे तालुका राजकीय परिषद जिल्हा सातारा<br>येल्लूर अध्यक्ष | १५.५.३७ |
| - | सोलापूर जिल्हा विद्यार्थी परिषद | १९४४ |
| | मनू - कराड राष्ट्र सेवादल संमेलन अध्यक्ष | १०.६.४५ |

संयुक्त महाराष्ट्र चळवळ

| | | |
|---|---|---|
| - | मध्यप्रदेश संयुक्त महाराष्ट्र परिषद<br>अमरावती अध्यक्ष | १९५१ |
| - | बेळगांव संयुक्त महाराष्ट्र एकीकरण परिषद<br>स्थापना व अध्यक्ष | १९.१२.५५ |
| - | कोल्हापूर जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषद<br>अध्यक्ष | ६.२.५६ |
| - | व्दिभाषिक विरोधी परिषद मुंबई | २९.९.५६ |
| | उद्घाटक संयुक्त महाराष्ट्र प्रचार बिंदु चौक | १७.१.५६ |
| | खटल्यातून दोषमुक्त | १२.८.५७ |
| | पन्हाळगड मोर्चा ठराव, पुणे अध्यक्षतेखाली | ५.११.५७ |

.....

- सीमा लढयात बेळगांव येथे अटक शिक्षा मंगळूर जेल ४ महिने कारावास — १.११.५८

[illegible]

प्रजा परिषाद विसर्जन व शेतकरी कामगार पक्षात प्रवेश — फेब्रु. १९५९

अपक्ष राहून काँग्रेसला सहकार्य — १९६१

- महाराष्ट्र शासनाच्या तिस-या पंचवार्षिक योजना सल्लागार समितीवर निवड

सन्मान
=====

- महाराष्ट्र शासन सन्मानपत्र — ५.८.१९६८
- स्वातंत्र्य लढयाच्या कार्याबाबत पद्मभूषाण किताब — २५.३.७२
- करवीर जनतेच्यावतीने अमृत महोत्सव व " डॉक्टर ऑफ लेटर्स " ही शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर सन्माननीय पदवी प्रदान — १२.१२.८०
- " डॉक्टर ऑफ सायन्स" फुले कृषि विद्यापीठ राहुरी ही पदवी बहाल.
- "डी. लिट." ही पदवी मराठवाडा विद्यापीठाने सन्मानार्थ प्रदान केली. — २५.३.१९८३
- रा. शाहु मेमोरिअल ट्रस्ट कोल्हापूर यांचा " शाहु पुरस्कार " — १९८५
- बागलांचे निधन — ६ मार्च १९८६

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=

## परिशिष्ट क्र. २

### भाई माधवराव बागलांचे वाङ्मय

#### स म ता

१. नव्या पिढीचे राजकारण
२. बेकारी व तीवर उपाय
३. समाज सत्ता की भांडवलशाही
४. मार्क्सवाद
५. सोशियालिझम
६. लेनिन स्टॅलिन
७. मानवी संहार बंद करा
८. सुलभ समाजवाद भाग १
९. सुलभ समाजवाद भाग २
१०. संस्थानिक, स. प्रजा व फेडरेशन

#### सा मा जि क

११. स्वराज्याचा शत्रू
१२. लग्नबंधान की तुरुंगवास
१३. खोडयावरचा प्रचारक
१४. गोवळकरी राज्य आले तर ?
१५. दत्ता बाळ आणि त्यांच टोळक
१६. कोल्हापूर दर्शन आणि शाहू महाराज
१७. मानवता वादाचा स्विकार करा

.....

१८. लोकशाही समाजवाद आणि निधर्मी
राज्य.

१९. बुध्दम् शरणम् गच्छामि.

## क ला

२०. कला आणि कलावंत भाग १

२१. कला आणि कलावंत भाग २

२२. कला विहार

२३. कोल्हापूरचे कलावंत

## लघुकथा

२४. जिव्हाळा

२५. संसार

२६. जुलूम

२७. अशी होती संस्थानी राजवट

## आत्मचरित्र

२८. बंधनात

२९. मी व प्रजा परिषद

३०. जीवन प्रवाह १ व २

३१. जीवन प्रवाह ३

३२. सत्याग्रहाकडून सहकार्याकडे

३३. जीवन संग्राम

३४. माझा विचार प्रवाह

३५. पडसाद

३६. संघर्ष व सन्मान

.....

व्यक्तिचित्रे
=========

३७. माझी सहधर्मचारिणी

३८. सहवासातून

३९. माझा परिवार भाग पहिला

४०. माझा परिवार भाग दुसरा

४१. बहुजन समाजाचे शिल्पकार

४२. आजही महात्मा फुले मार्गदर्शक

४३. शाहू महाराजांच्या आठवणी

४४. माझे यशवंतराव

४५. एम. बी. लोहिया

संपादित ग्रंथ
==========

४६. प्रभाकर पंत कोरगांवकर स्मृती ग्रंथ

४७. हंटर - संपादक

४८. खंडेराव बागलांचे निवडक लेख

४९. शिव-शाहू, फुले-आंबेडकर तसेच विठ्ठल रामजी शिंदे- भाऊराव पाटील आमचे मार्गदर्शक

५०. लोकराजा शाहू

५१. हंटरकारांचे निवडक लेख (आवृत्ती दुसरी सुधारित)

याशिवाय विविध वृत्तपत्रात व गौरव ग्रंथात बागलांचे लेख प्रकाशित झालेले आहेत.

=0=0=0=0=0=0=0=0=

परिशिष्ट क्र. ३

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१२ डिसेंबर १९

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने माननीय माधवरावजी बागल यांना सन्मानदर्शक " डॉक्टर ऑफ लेटर्स " ही पदवी प्रदान करताना कुलगुरु रा. कृ. कणबरकर यांनी वाचलेले

गौ र व प त्र

केवळ कोल्हापूरातच नव्हे तर सा-या महाराष्ट्रात भाई माधवराव बागल या नांवाने लोकप्रिय असलेल्या या क्रांतीकारक नेत्याचे संपूर्ण नांव माधवराव खंडेराव बागल असे आहे. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात तारीख २८ मे १८९६ रोजी त्यांचा कोल्हापूरात जन्म झाला. वयाची ८५ वर्षे पूर्ण करुन शतकपूर्तीकडे ते वाटचाल करीत आहेत. स्वतंत्र देशात जन्मले असते तर एक थोर प्रतिभावान कलावंत म्हणून प्रसिध्द झाले असते. परंतु भारतीय जनतेच्या पारतंत्र्याच्या आणि सामाजिक गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठी त्यांनी आयुष्यभर सतत झुंज दिली. भाईजींच्या जीवनाचा गौरव म्हणजे या झुंजार लढयाचाच गौरव आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरु नये.

.....

मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये पेंटिंग आणि शिल्पकला या दोन्हीही विभागाचा अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला तो सतत पहिल्या क्रमांकाची स्कॉलरशिप पटकावून. परंतु त्यांच्या हातामध्ये कुंचल्याबरोबरच लेखणीही आली. त्यांचे वडील श्री. खंडेराव बागल हे " हंटर " नांवाचे साप्ताहिक चालवित असत. ते कोल्हापूर संस्थानातील मराठा समाजातले पहिले एल.एल.बी. वकील होते. आपल्या पत्रातून जुन्या रुढी व अन्याय यावर "हंटर" चे प्रहार करुन जनजागृतीचे कार्य ते करीत असत. आपल्या पिताजींचीच ही परंपरा पुढे चालवून १९२५ ते १९३० अखेर " हंटर " पत्राचे संपादन त्यांनी केले. परंतु दडपशाहीच्या त्या काळात "हंटर" पत्र बंद पाडले गेले. " आघाडी आणि धडाडी" या नांवानी नंतर काढलेले पत्रेही बंद पाडण्यात आली. भाईजींच्या जीवनातील स्वातंत्र्य लढयाचा प्रारंभ हा असा झाला.

संस्थानी प्रजा राजनिष्ठ या प्रजेला स्वातंत्र्यासाठी लढा द्यायला जागे करुन उठविणे सोपे काम नव्हते. परंतु स्वत: तुरुंगवास सोसून हातात व पायात बेडया अडकवून प्रजेला लढयाला तयार केले. प्रथम संस्थान कॉंग्रेस कमिटी व नंतर संस्थान प्रजा परिषद या नांवाने संघटना त्यांनी उभारली. कार्याध्यक्ष पदाची अवघड धुरा त्यांनी सांभाळली. एक हजार रुपये दंड आणि दोन वर्षे सक्तमजुरी अशी पहिली शिक्षा भाईजींना ठोठावण्यात आली. परंतु भाईजींनी मात्र कारागृह म्हणजे स्वातंत्र्य मंदिर मानले.

.....

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. कोल्हापूर संस्थान लोकनियुक्त मंत्रीमंडळ स्थापने झाले. परंतु महाराजांचे निमंत्रण आले असतानाही भाईजींनी मुख्यमंत्रीपद नाकारले आणि महात्मा गांधीप्रमाणे प्रजेचा नम्रसेवक व समाजवादाचा प्रचारक म्हणूनच राहणे पसंत केले. नि:स्वार्थी व त्यागी लोकनेता अशी भाईजींची उज्वल प्रतिमा जनतेच्या हृदय-सिंहासनावर विराजमान झाली. कालौघानुसार कोल्हापूर संस्थान प्रजासत्ताक भारतीय संघराज्यात विलीन झाले. संस्थांनी प्रजेच्या स्वातंत्र्य लढयाचे भाईजीचे नेतृत्व व कर्तृत्व कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित राहिले नव्हते. भोर, मिरज, सांगली, सावंतवाडी, जत, अक्कलकोट, कुरूंदवाड इत्यादी दक्षिण संस्थाने आणि सातारा रत्नागिरी या जिल्ह्यातील जनतेनेही आपले मार्गदर्शक व नेते म्हणून त्यांचा स्विकार केला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या सीमा लढयाच्या व गोवामुक्ती आंदोलनातही आघाडीवर राहून त्यांनी तुरूंगवास भोगला आहे.

भाईजींच्या राजकीय जीवनातील झुंज जितकी तेजस्वी आहे तितकीच ती सामाजिक व धार्मिक जीवनातही प्रखर आहे. महात्मा फुले, कार्ल मार्क्स, राजर्षि शाहू , डॉ. आंबेडकर ही त्यांची स्फुर्तिस्थाने आहेत. १९३२ साली त्यांनी करवीर निवासिनी महालक्ष्मी व नृसिंहवाडी येथील मंदिरात अस्पृश्यासह प्रवेश केला.

.....

घराबाहेर सामुहिक भोजने घडवून आणली.त्याच बरोबर स्वत:च्या घरीही महार मुलगा विद्यार्थी म्हणून कुटूबांत ठेवून घेतला. बोलघेवडे म्हणून नव्हेतर कर्ते समाज सुधारक म्हणून खडतर जीवन त्यांनी पसंत केले. प्रजा परिषदे तर्फे कोल्हापूर नगरपालीकेत बहुमत मिळवून एका हरीजन पदवीधरास नगराध्यक्ष पदावर आरुढ केले. आंतरजातीय विवाह घडवून आणले. अखिल भारतीय सत्यशोधक समाजाच्या १९५८ मध्ये सातारा रोड येथे झालेल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. जातियता, अस्पृश्यता, सामाजिक विषमता याविरुध्द त्यांनी सतत झुंज दिली. खऱ्याखुऱ्या सत्यशोधकाच्या जीवन निष्ठेनुसार देवाधमांवर व अंध श्रध्दांवर ते विश्वास ठेवित नाहीत आणि यापुढची पायरी म्हणजे डॉ.आंबेडकराचे अनुयायित्व स्वीकारुन भाईजींनी १९७२ साली बौध्द धर्मात प्रवेश केला.

मार्क्सवादी विचारसरणीनुसार मजूर चळवळीचा पाया कोल्हापूरात भाईजींनी प्रथम घातला. १९३१ साली म्हणजे ५० वर्षापूर्वी त्यांनी मजूर संघटनेस प्रारंभ केला.शाहू मिल मजूर संघाचे ते पहिले संस्थान अध्यक्ष झाले. अशाच इतर क्षेत्रांतील श्रमजीवाच्या संघटनानाही त्यांनी मार्गदर्शन केले. मोर्चे अन्न सत्याग्रह, संप इत्यादी मार्गांनी कामगारांना त्याचे न्याय हक्क मिळवून दिले.

.....

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

राजकिय व सामाजिक संघर्षाच्या धकाधकीच्या जीवनातूनही त्यांनी आपली कलोपासना अखंड राखली. जलरंगातील त्यांची निसर्ग चित्रे अप्रतिम चित्रकलेचे उत्कृष्ट नमूने म्हणून जाणकारानी वाखाणलेली आहेत. ही सारी चित्रे त्यांनी स्वत: जवळ न ठेवता ताराराणी विद्यापीठ टाऊन हॉल, म्युझियम या सारख्या सार्वजनिक संस्थाना देणगी म्हणून दिली आहेत. कोल्हापूरात अन्य शिल्पकारानीही घडवलेल्या कलात्मक पुतळ्याची उभारणी भाईजींच्या पुढाकारामुळे झाली आहे. वरूणातीर्थावरील महात्मा गांधीचा पूर्णाकृती पुतळा आणि बिंदु चौकातील हुतात्मा स्मारकस्तंभ व फुले-आंबेडकराचे पुतळे भाईजींच्या धडपडीमुळेच उभे केले गेले.

राजकीय व सामाजिक क्रांतीच्या पुरोगामी विचारांच्या प्रचारासाठी जशी त्यांनी लेखणी उचलली तशी ललीत साहित्याच्या निर्मितीसाठीही ती त्यांनी लीलेने हाताळली. " बेकार व तीवर उपाय " हे मराठीतले समाजवादावरले पहिले पुस्तक भाईजीनी लिहिले आहे. मार्क्सवाद, बुध्दधर्म, सामाजिक समानता असे व वैचारिक साहित्य आणि लघुकथा, कला, व्यक्तिचित्रे, आत्म चरित्रे व " अखंड भारत " सारख्या साप्ताहिकाचे संपादन असे ललीत साहित्य मिळून त्याचे एकूण ५५ ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. लौकिक अर्थाने मॅट्रीक पर्यंतचेच औपचारिक शालेय शिक्षण घेतलेल्या भाईजींनी अनेक अभ्यास पूर्ण ग्रंथाचे वाचन, मनन व चिंतन केलेले आहे.

......

भाईजींचे जीवन ज्वाला आणि फुले यांनी विनलेले आहे. ज्वालाप्रमाणेच त्यातील फुलांचाही रंग " लाल " आहे. सतत धागधागणारे होमकुंड असे त्यांच्या झुंजार जीवनाचे यथार्थ वर्णन होवू शकेल. कष्टमय आयुष्याच्या या वाटचालीत त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. रमाबाईंनी त्यांना प्रेमाने आणि धीराने अखेर पर्यंत साथ दिली. करवीर नगरीच्या या सुपुत्राचा गौरव कोल्हापूर नगरपालीकेने सर्व प्रथम १९४१ साली केला. महाराष्ट्र शासनाने " स्वातंत्र्य सैनिक सन्मानपत्र " व " दलीत मित्र " गौरव पत्र प्रदान केले. भारताच्या प्रधानमंत्र्यांनी ताम्रपट दिला. तर राष्ट्रपतींनी " पद्मभूषण " पदवी देवून भूषविले. भाईजींना आता पर्यंत अशी लोकमान्यता आणि राज्यमान्यता लाभली आहे.

राजकीय, सामाजिक, वाङ:मयीन व कलेच्या क्षेत्रात तपस्व्याप्रमाणे अव्याहत कार्य करणा-या श्री. माधवरावजी ब बागल यांचा सन्मान करण्याची संधी आम्ही घेत आहोत.

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=

## परिशिष्ट क्र. ४

### महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
### भाई माधवराव खंडेराव बागल यांना
### डॉ. ऑफ सायन्स ही पदवी देवून
### गौरव केला

कोल्हापूरचे जेष्ठ सामाजिक नेते डॉ. भाई माधवराव बागल यांना राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठातर्फे डॉ. ऑफ सायन्स ही सन्मान्य पदवी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दत्ताजीराव साळुंखे यांचे हस्ते प्रदान करण्यात आली.

कृषि महाविद्यालयात हा भव्य समारंभ झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. रामराव जाधव यांनी आपल्या स्वागतपर भाषणात भाई माधवराव बागल यांच्या सामाजिक क्रांती कार्याचा गौरव केला.

उर्मिलादेवी साळुंखे भाई बागल यांचा गौरव करताना म्हणाल्या अन्यायाविरुध्द पोट तिडकिने व तळमळीने भाईजीने केलेली भाषणे म्हणजे बंदुकीच्या गोळ्या नव्हेत ,तोफेचे गोळे आहेत.

आमदार दिनकरराव यादव - भारतीय स्वातंत्र्य लढ्यात तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाईजींनी नि:स्वार्थ वृत्तीने व निर्भिड वाण्याने महान कार्य केल्याचे सांगितले.

......

यानंतर डॉ. दत्ताजीराव साळुंखे यांच्या हस्ते भाई बागल याना डॉक्टर ऑफ सायन्स पदवी प्रदान करण्यात आली. मानवता व कलेची अपार सेवा करणारा थोर समाज सुधारक अशा शब्दात भाईजींचा गौरव करुन आघाडी व धाडाडी या दोन साप्ताहिकातून सामाजिक जागृतीचे रणशिंग फुंकणाऱ्या भाईजींनी राजर्षि शाहु, डॉ. आंबेडकर, कि विठ्ठल रामजी शिंदे आदी महा-पुरुषांचे विचार समाजात रुजविण्याचा अविश्रांत प्रयत्न केला आहे.

समारंभातील गौरवपर भाषणात भारावून गेलेले भाई बागल पदवी स्वीकारतांना म्हणाले " हा भाई माधवराव बागल कुणी वेगळाच असावा " या सन्माननीय पदवी बद्दल आपण ऋणी आहोत.

जगाची जी प्रगती झाली आहे ती विज्ञानाने, शास्त्रीय विचाराने बुध्दीला जी गोष्ट पटेल तीच विज्ञान मान्य करील. अध्यात्मवादी संत श्रध्देवर जगत असले तरी शास्त्र पुराव्या शिवाय कोणतीही गोष्ट मान्य करीत नाहीत असे भाईजींनी सांगितले.

-x-x-x-x-x-x-x-

## परिशिष्ट क्र. ५

## मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२५ मार्च १९८३

भाई माधवराव खंडेराव बागल यांना सन्मानार्थ डी. लिट् पदवी देण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष पदवीदान समारंभ प्रसंगी सादर करण्यात आलेले

### गौरव पत्र

माननीय कुलगुरु महोदय,

मराठवाडा विद्यापीठाने भाई माधवराव खंडेराव बागल यांनी समाज परिवर्तनासाठी केलेल्या कामगिरी बद्दल त्यांना सन्मानदर्शक डी. लिट्. ही पदवी देवून त्यांचा गौरव करण्याचा ठरविले आहे.

भाई माधवराव खंडेराव बागल यांचे जीवन हे नवसमाज निर्मितीसाठी समर्पित झालेले जीवन असून ते सदैव धगधगणाऱ्या अग्निकुंडाप्रमाणे रहातआले आहेत. जीवनाच्या अनेक क्षेत्रांत त्यांनी समाज परिवर्तनासाठी उग्र लढे दिले. मुळात कलावंताचे असलेले हे मन कलाक्षेत्रा बरोबरच राजकिय सामाजिक जीवनातही सतत नवनिर्मितीसाठी संघर्ष देत राहीले. चित्रकार, साहीत्यिक, तत्त्व चिंतक, पत्रकार म्हणून तर ते महाराष्ट्रात विख्यात आहेतच पण त्यापेक्षांही एक समाज सुधारक आणि राजकारणी म्हणून ते महाराष्ट्रात भारतात अधिक परिचीत आहेत.

......

कोल्हापूर संस्थानात लोकशाही राज्यपध्दती निर्माण करण्यासाठी आणि जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी १९२५ पासून अनेक लढे दिले. त्यासाठी त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९३३ मध्ये प्रजा परिषद या राजकीय संस्थेची स्थापना केली. भाषण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकनियुक्त नगरपालीकेची स्थापना करण्यासाठी आणि संस्थानाचा कारभार लोकशाही पध्दतीने चालविण्यासाठी त्यांनी दिलेले लढे आणि त्यासाठी त्यांना भोगावा लागलेला सश्रम कारावास महाराष्ट्रात तरी अविस्मरणीय आहे. दक्षिण संस्थान रिज़नल कौन्सिलच्या अध्यक्षपदावरुन त्यांनी १९४६ मध्ये महाराष्ट्रा बाहेरच्या स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्वही केले. या यशस्वी लढयात सत्ताग्रहण करण्याच्या त्यांना ज्या संधी आल्या त्या त्यानी निग्रहाने बाजूला सारुन सामान्य लोकांत राहणेच पसंत केले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही भाई माधवरा बागल हे राजकिय अन्यायाविरुध्द लढतच राहीले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी दक्षिण महाराष्ट्रात त्यांच्या नेतृत्वाखाली फार मोठी चळवळ उभी राहीली.

सत्यशोधक समाजाच्या सामाजिक विषमतेविरुध्द चाललेल्या चळवळींनी प्रभावित होवून १९३२ पासून या कलाहृदयी पुरुषाने सामाजिक विषमतेविरुध्द बंड पुकारले. सामाजिक समतेच्या प्रस्थापनेचे आणि अस्पृश्यता निवारणाचे व्रत त्यांनी

......

आयुष्यभर निष्ठेने चालविले. नृसिंहवाडीच्या पादुका, ब्रम्हपुरीचे दुतांडी मारुती देवालय आणि कोल्हापूरची जगदंबा मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करविले. अस्पृश्यांसह सर्व जाती जमातीची सहभोजने घडवून आणली. मिश्र जाती विवाहांना सक्रीय उत्तेजन दिले. अस्पृश्य विद्यार्थ्यास स्वत:च्या घरी वाढविले. त्यांच्या या कार्याची पावती म्हणूनच त्यांना मुंबई इलाखा हरीजन परिषदेचे अध्यक्षपद बहाल करण्यात आले.

केवळ राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातच नव्हे तर कामगार विश्वातही भाई माधवराव बागलांनी अविस्मरणीय कामगीरी बजावली आहे. मिल मजूर, सिने थिएटर कामगार, विडी कामगार, म्युनिसिपल कामगार आणि हमाल यांच्या संघटना बांधून त्यांनी आर्थिक विषमतेविरुध्द आणि अन्यायाविरुध्द अनेक लढे दिले.

मानवी जीवनावर नितांत श्रध्दा असणारे व मानवी जीवन नव्याने घडवू पाहणारे हे एक कलावंत मन आहे. " देव न मानणारा देवपुरुष " असे गो.ग. आगरकरांचे जे वर्णन केले जाते ते भाई माधवराव बागलांनाही यथार्थपणे लागू पडते. देवळातल्या देवाकडे पाठ फिरवून त्यांनी माणसातला देव जागवला माणसातल्यादेवाला ग्रासणाऱ्या सर्व प्रकारच्या ग्रहणाविरुध्द हे प्राणपणाने झगडले. सर्व प्रकारच्या अन्यायाविरुध्द आणि विषमतेविरुध्द ते खंबीरपणे उभे राहीले.

.....

समाजातील अंधश्रध्दा, ढोंग आणि बुवाबाजी नष्ट होण्यासाठी ते अविरतपणे झटले. या कार्यासाठी त्यांनी जसे लोक संघटन केले आणि लोकांच्या चळवळी उभ्या केल्या. तसेच आपली सिध्दहस्त लेखणीही आजतागायत चालविली आयुष्याच्या पूर्वार्धात "हंटर" व "अखंड भारत" ह्या वृत्तपत्राचे संपादन केले. त्या व्दारा निर्भयपणे लोकजागृती व लोकशिक्षण केले. संस्थानाधिपतींचा रोषाही ओढवून घेतला. लोकशिक्षणाच्या प्रेरणेतून त्यांनी राजकीय विचारावर सुबोध पुस्तके लिहिली. मार्क्सवाद, सोशियालिझम व कम्युनिझम, सुलभ समाजवाद, महात्माजींची कामधेनु, सामाजिक विचारमंथने अशा पुस्तकांतून त्यांनी राजकीय विचार समाजात रुजवला. " महात्मा फुले " ,"शाहु महाराजांच्या आठवणी ", "बहुजन समाजाचे शिल्पकार " या ग्रंथातून त्यांनी महाराष्ट्रातील थोर व्यक्तींचा परिचय घडवला. "जीवन प्रवाह" हे आत्मचरित्र लिहून परखडपणे स्वत:च्या जीवनाचा शोध घेतला. या कलावंत मनाने केवळ वैचारिक व प्रचारात्मक ग्रंथच लिहिले नाहीत तर विपुल कथालेखनही केले. "जिव्हाळा", "जुलूम" हे त्यांचे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. जनहिताची साधना ही त्यांच्या सर्वच लेखनामागे प्रेरणा रहात आली.

भाई माधवराव बागलांचे हे जीवन अनेक परिमाणांची परिपूर्ण बनलेले जीवन आहे. नवसमाजाच्या निर्मितीसाठी गेली कित्येक वर्षे सत्याशी अविरतपणे झगडून घडत गेलेले हे एक समृध्द व्यक्तिमत्व आहे. महाराष्ट्राच्या आधुनिक सामाजिक सांस्कृतिक रुपाची जडण घडण करणाऱ्या मोजक्या शिल्पकारांमध्ये भाई माधवराव बागल यांची गणना करावी लागेल.

.....

श्रीयुत भाई माधवराव बागल यांना " डॉक्टर ऑफ लेटर्स " ही सन्माननीय पदवी बहाल करुन मराठवाडा विद्यापीठ त्यांच्या थोर सामाजिक सांस्कृतिक कार्याचा, त्यांनी केलेल्या साहित्यसाधनेचा व कलासाधनेचा गौरव करू इच्छिते.

मराठवाडा विद्यापीठ कार्यकारिणी व विधीसभा यांनी एकमुखाने ठरविल्याप्रमाणे " डॉक्टर्स ऑफ लेटर्स " ह्या सन्मानदर्शक पदवीची दीक्षा देवून अनुग्रह करण्यासाठी मी त्यांना आपणापुढे सादर करीत आहे.

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=